# पर्यावरण आणि वन मंत्रालय

भारत सरकार

## प्रस्तावित सागरकिनारा नियमन क्षेत्र सुधारणा, २०१०

उद्देशिका

पर्यावरण आणि वन मंत्रालयातर्फे सागरकिनारा क्षेत्र अधिसूचना २०१० जारी करण्याचा प्रस्ताव ठेवित आहे. याबाबत आवश्यक कार्यपद्धती आणि कालबद्ध मुदत पुढीलप्रमाणे असेल.

- पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या संकेतस्थळावर "सागरकिनारा नियमन क्षेत्र, २०१०" असे शिर्षक असलेला दस्तावेज चर्चेसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामध्ये, सागरकिनारा नियमन क्षेत्र, २०१० मध्ये समाविष्ट असलेली ठळक वैशिष्ट्ये आणि प्रस्ताव अधोरेखित करण्यात आला आहे.

- उपरोक्त चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज प्रस्तावित सागर किनारा नियमन क्षेत्र, २०१० च्या पूर्व-मसुद्याशी जोडण्यात आला आहे.

- **चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज** आणि **प्रस्तावित सागरकिनारा नियमन क्षेत्र, २०१०** चा पूर्व-मसुदा मंत्रालयाच्या www.envfor.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

- उपरोक्त चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज प्रस्तावित सागर किनारा नियमन क्षेत्र, २०१० चा पूर्व-मसुदा यावरील सूचना दिनांक ३० मे, २०१० पर्यंत मागविण्यात येत आहेत.

- मंत्रालयाच्या संकेतस्थळवर उपरोक्त चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज प्रस्तावित सागर किनारा नियमन क्षेत्र, २०१० चा पूर्व-मसुदा यांची हिंदी आवृत्ती आणि स्थानिक भाषांमध्ये नमोल्लेखित, गुजराती, मराठी, कन्नड, मल्याळम्, तेलगू, ओरिया आणि बंगालीमध्येही उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

- उपरोक्त चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज प्रस्तावित सागर किनारा नियमन क्षेत्र, २०१० वरील सूचना प्राप्त झाल्यानंतर, मंत्रालयाकडून सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०१० चा मसुदा अंतिम स्वरुपात तयार करण्यात येईल आणि कायदे मंत्रालयाकडून त्याचे कायदेशीर मूल्यमापन करुन घेण्यात येईल.

- त्यानंतर पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०१० चा मसुदा जारी करण्यात येईल ज्यावर मसुदा जारी केलेल्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत लोकांकडून सूचना आणि हरकती मागविण्यात येतील.

- लोकांकडून प्राप्त झालेल्या सूचना आणि हरकतींची दखल घेतल्यानंतर सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०१० चा मसुदा अंतिम स्वरुपात पारित करण्यात येईल.

# पर्यावरण आणि वन मंत्रालय

भारत सरकार

## सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०१० बाबत चर्चेसाठी उपलब्ध दस्तावेज

भारताला ७५०० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून आपली जवळपास २५ टक्के लोकसंख्या येथे राहते. यापैकी जवळजवळ सर्व लोक ५० किलोमीटरच्या कक्षेत राहतात. यामध्ये, ज्यांची उपजीविका समुद्रावर अवलंबून आहे अशा १० दशलक्ष कोळी लोकांचा समावेश आहे.

सागरी पर्यावरणाचे महत्त्व आणि सागरकिनारा परिसंस्थांचे विकासकामांमुळे तयार होणाऱ्या दबावापासून संरक्षण करण्याची गरज लक्षात घेता मंत्रालयाने, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत सागरकिनारा नियम क्षेत्र अधिसूचना, १९९१ जारी केली.

सदर अधिसूचना आजही लागू असून त्याअंतर्गत किनाऱ्यावरील ५०० मीटरपर्यंतचे क्षेत्र आणि समुद्राच्या भरती-ओहोटीमध्ये येणारा १०० मीटर पाण्याखालील क्षेत्राचे संरक्षण आणि नियमन केले जाते. या क्षेत्रात हाती घेऊ पाहाणाऱ्या सर्व विकासकामांचे या अधिसूचनेनुसार नियमन केले जाते. देशातील सागरकिनाऱ्यांचे या अधिसूचनेनुसार वर्गीकरण सागरकिनारा नियमन क्षेत्र - एक (पारिस्थितीकीय किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र - दोन (नगरपालिका क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र - तीन (ग्रामीण क्षेत्र) आणि सागरकिनारा नियमन क्षेत्र - चार (लक्षद्विप आणि अंदमान व निकोबार बेटे) याप्रमाणे करण्यात आले आहे.

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ जारी केल्यापासून त्यामध्ये जवळजवळ २५ वेळा दुरुस्त्या करण्यात आल्या. तसेच, अनेक राज्य सरकार आणि संबंधित विभागांनी सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यातील अडचणी मांडल्या.

सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीतील समस्या तपासण्यासाठी मंत्रालयाने सन २००४ मध्ये, प्राध्यापक एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नेमली. या समितीने फेब्रुवारी, २००५ मध्ये आपला अहवाल सादर केला. या समितीने मुख्य शिफारस अशी केली की १९९१ च्या अधिसूचनेच्या जागी सागर किनारा व्यस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ चा मसुदा जारी करावा.

तथापि सागर किनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ च्या मसुद्यावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रीया प्राप्त झाल्या ज्यामध्ये कोळी आणि अन्य स्थानिक जनसमुहांचे प्रमाण उल्लेखनीय

होते. या प्रतिक्रियांमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मसुद्यांचा अभ्यास करण्यासाठी मंत्रालयाने, जून २००९ मध्ये प्राध्यापक एम. एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या एका चार सदस्यीय समितीची स्थापना केली. या समितीने "फायनल फ्रंटियर" या शिर्षकासह तयार केलेला अहवाल दिनांक १६ जुलै २००९ रोजी मंत्रालयास सादर केला आणि सरकारने तो स्वीकारला. (हा अहवाल www.moef.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.) या अहवालातील मुख्य शिफारस अशी होती की सागरकिनारा व्यवस्थापन क्षेत्र अधिसूचना, २००८ चा मसुदा रद्द करणे आणि त्या ऐवजी सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ ला अधिक बळकटी आणणे.

उपरोक्त बाबी लक्षात घेऊन स्वामीनाथन समिती अहवालातील शिफारसी आणि पर्यावरण शिक्षण केंद्र या संस्थेने आयोजित केलेल्या जनपरिसंवादांमध्ये मांडण्यात आलेल्या दुरुस्त्या किंवा वगळण्यात याव्यात अशा तरतूदी किंवा नव्याने समाविष्ट कराव्या अशा तरतूदींचा विचार करुन सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ला अधिक बळकटी आणण्याच्या दृष्टीने पर्यावरण आणि वन मंत्रालयाने पाऊल उचलले.

## सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ मधील प्रस्तावित दुरुस्त्यांचा सारांश

सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, २०१० च्या मसुद्यामध्ये खालील मुद्दे प्रस्तावित आहेत.

१. **जलव्याप्त क्षेत्राचा समावेश:** १९९१ च्या अधिसूचनेच्या कक्षेत जलव्याप्त क्षेत्राचा समावेश नाही. सागरकिनारा आणि जलव्याप्त क्षेत्रातील जैवविविधतेचा एकात्मिकरित्या विचार करुन अशा जलव्याप्त क्षेत्राचे महत्त्व मान्य करुन समुद्रातील १२ नॉटीकल मैल सागरी जलव्याप्त क्षेत्र आणि भरती-ओहोटीमेळे प्रभावित जलव्याप्त क्षेत्र समाविष्ट केले जाईल.

२. **धोक्याचे मापन करणाऱ्या यंत्रणेचे पुनर्मुल्यांकन:** १९९१ च्या अधिसूचनेमध्ये समुद्रपातळीत होणाऱ्या वाढीमुळे समुद्रकिनाऱ्यांना पोहोचणाऱ्या धोक्यांचा विचार केलेला नाही. भरती-ओहोटी, लाटा, समुद्रपातळीत वाढ आणि किनाऱ्यामधील बदलांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचे मापन करणे आणि सागरकिनाऱ्यावरील मालमत्ता व लोकवस्त्यांना पुरेसे संरक्षण पुरवणाऱ्या यंत्रणेची तरतूद समाविष्ट केली जाईल.

३. **कृती आराखड्याची निर्मिती:** १९९१ च्या अधिसूचना प्रदूषणावर नियंत्रण आणणाऱ्या योग्य उपाययोजना सूचवित नाही. राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशातील प्रशासनाने प्रक्रीया न केलेला कचरा, सांडपाणी, मैला यांसह घनकचरा व्यवस्थापनाचा कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले जातील. प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक

कामाकरीता राज्य शासन / केंद्रशासित प्रदेशातील शासन आवश्यक निधी उपलब्ध करुन देईल. हा कृती आराखडा सहा महिन्यांच्या आत तयार करुन मंत्रालयास सादर केला जाईल आणि पर्यावरण आणि वन मंत्रालयाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंमलात येईल. अंमलबजावणीवर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ देखरेख ठेवील.

४. **किनाऱ्यांच्या धूप-सदृश क्षेत्रांचे वर्गीकरण:** १९९१ च्या अधिसूचनेमध्ये किनाऱ्यांची धूप होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या बंदर विकास आणि इतर विकास कामांवर बंधने आणण्याची तरतूद नाही. किनाऱ्यावरील मानवी हस्तक्षेप बहुसंख्य किनाऱ्यांची धुप होण्यास कारणीभूत ठरतो. सागरकिनाऱ्यांची कधीही भरून न येणारी हानी लक्षात घेऊन अधिसूचनेमध्ये ठेवण्यात येणाऱ्या तरतूदीनुसार सागरकिनाऱ्यांचे वर्गीकरण **अति धूप क्षेत्र, मध्यम धूप क्षेत्र** आणि **अल्प धूप क्षेत्र किंवा स्थिर धूप क्षेत्र** असे करण्यात येईल. अति धूप क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकल्पाला परवानगी देण्यात येणार नाही तर मध्यम धूप क्षेत्रामध्ये पर्यावरणीय आघात मूल्यमापन अत्यंत सखोल किंवा सर्वसमावेशक पद्धतीने करण्याची अट असेल.

५. **नवीन वर्गीकरण योजना:** सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये चार वर्गीकरण (सागरकिनारा नियमन क्षेत्र - एक (पारिस्थितीकीय किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र - दोन (नगरपालिका क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र – तीन (ग्रामीण क्षेत्र) आणि सागरकिनारा नियमन क्षेत्र - चार (लक्षद्विप आणि अंदमान व निकोबार बेटे) याप्रमाणे करण्यात आले आहे. नवीन तरतूदीमध्ये नियमन क्षेत्र सागरकिनारा नियमन क्षेत्र - एक (पारिस्थितीकीय किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र – दोन (नगरपालिका क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र - तीन (ग्रामीण क्षेत्र), सागरकिनारा नियमन क्षेत्र - चार (जलव्याप्त क्षेत्र) आणि सागरकिनारा नियमन क्षेत्र - पाच (विशेष विचाराधीन क्षेत्र) असे असेल. लक्षद्विप आणि अंदमान व निकोबार बेटांसाठी द्विप संरक्षण क्षेत्र अधिसूचना (मार्च) २०१० च्या मसुद्यामध्ये विशेष तरतूद करण्यात आली आहे. (सध्या या अधिसूचनेच्या मसुद्यावर सूचना आणि हरकती मागविण्यात येत आहेत.)

६. **विशेष बाबी:** सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये विविधता, सामाजिक-आर्थिक परिस्थिती, विकासकामांचा दबाव इ. गोष्टींचा वेगवेगळा विचार न करता सरसकट समान नियम लागू केलेले आहेत. तथापि, काही विशेष परिस्थितीचा विचार करुन पुढील क्षेत्रांना विशेष विचाराधीन बाबी म्हणून प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. **बृहन्मुंबई आणि नवी मुंबई** – बृहन्मुंबई आणि नवी मुंबईच्या सागरकिनाऱ्यांवर वसलेल्या लोकसंख्येची घनता खूप आहे. विविध

विकासकामांचा येथील सागरकिनाऱ्यांवर प्रचंड दबाव आहे. मुंबई आणि नवी मुंबईतील बरीच मोठी लोकसंख्या किनाऱ्यांवर वसलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. या झोपडपट्ट्यांमुळे केवळ तथील पर्यावरणच प्रदूषित होते असे नाही तर समुद्रकिनारी सतत राहात असल्यामुळे त्या अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत. जवळजवळ १३६ झोपडपट्ट्या किनाऱ्यापासून ५०० मीटरच्या क्षेत्रात वसल्या आहेत. बृहन्मुंबई आणि नवी मुंबईच्या किनाऱ्यांवर खारफुटी किंवा तिवरांच्या जंगलाचे प्रमाणही उल्लेखनीय आहे जे जमिन आणि समुद्रादरम्यान आघातप्रतिबंधकाप्रमाणे कार्य करते. त्यापुढे, जवळपास संपूर्ण शहराचे सांडपाणी, मैला आणि औद्योगिक टाकाऊ पदार्थ खाडी व समुद्रात सोडले जाते. उपरोक्त मुद्दे लक्षात घेऊन, बृहन्मुंबई आणि नवी मुंबईसाठी विशेष विचाराधीन बाबी म्हणून मान्यता देण्याची आवश्यकता आहे. स्वामीनाथन समितीच्या अहवालात शिफारस केल्याप्रमाणे सागरकिनारा नियमन क्षेत्रात काही ठराविक इमारतींच्या पुनर्विकासाची तरतूद ठेवण्यात येईल. इमारत बांधणीसाठी सार्वजनिक वित्तपुरवठ्याची अट ठेवून खाजगी विकासकांच्या माध्यमातून इमारत बांधणीचे प्रकल्प विचारात घेतले जातील.

२. **केरळ** – केरळमधील सागरीकिनाऱ्यांवरील पर्यावरण अद्वितीय आहे ज्यामध्ये, बॅकवॉटर क्षेत्रात ३०० पेक्षा जास्त द्विप किंवा बेटे आहेत. मरुवक्कड, चल्लाकडवु, कंडाकडवु, पुथंथोडे, कन्नामाली, चेरियाकडवु आणि कट्टी परंबिल अशा अनेक बेटांवरील लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौरस किलोमीटर मागे २१५० व्यक्ती इतके आहे. या बेटांचे वर्गीकरण सागरकिनारा नियमन क्षेत्र - एक किंवा सागरकिनारा नियमन क्षेत्र - तीनमध्ये आले असल्यामुळे सागरकिनारा नियमन क्षेत्र - एकमध्ये विकासाची कामे करता येत नाहीत तर सागरकिनारा नियमन क्षेत्र - तीनमधील ०-२०० मीटर क्षेत्र **"ना-विकास क्षेत्र"** यामध्ये मोडते. या क्षेत्रांमध्ये राहाणाऱ्या जनसमुहांकडून राज्य सरकार आणि पर्यावरण आणि वने मंत्रालयास विनंती करण्यात येत आहे की त्यांच्या राहत्या घरांच्या बांधणीसाठी नियमांमध्ये सवलत द्यावी. याबाबत, अनेक खटले अनिर्णित अवस्थेत आहेत. भौगोलिक वैशिष्ट्यांची बाब लक्षात घेऊन केरळच्या किनाऱ्यांसाठी विशेष विचाराधीन बाब ठरवून बॉकवॉटर क्षेत्रातील बेटांसाठी ना-विकास क्षेत्रा बाबत असलेली अट शिथिल करुन ५० मीटरपर्यंत आणावी असे प्रस्तावित केले आहे.

३. **सुंदरबन आणि इतर पारिस्थितीकीय किंवा पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाची क्षेत्रे** – सुंदरबन हे देशातील सर्वाधिक खारफुटीचे प्रमाण असलेले

क्षेत्र आहे आणि या जैव-भौगोलिक क्षेत्रात अंदाजे ५ लाख लोक राहातात. सुंदरबनला समुद्रपातळीत होणाऱ्या वाढीमुळे धोका आहे. त्याचबरोबर, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे येथिल स्थानिक जनसमुहांना खडतर आयुष्याला सामोरे जावे लागते. सुंदरबन आणि खंबातचे आखात, गुजरातमधील कच्छचे आखात, महाराष्ट्रातील मालवण, वसई-मनोरी, आचरा-रत्नागिरी, कर्नाटकमधील कारवार आणि कुंडापूर, केरळमधील वेम्बनाड, ओरिसामधील भितरकनिका, आंध्र प्रदेशमधील कोरींगम, पूर्व गोदावरी आणि कृष्णा अशा पारिस्थितीकीय किंवा पर्यावरणीय महत्त्व असलेल्या क्षेत्रांसाठी एकात्मिक व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे. या क्षेत्रांना अत्यंत असुरक्षित सागरकिनारा क्षेत्र (Critical Vulnerable Coastal Area) म्हणून घोषित केले जाईल ज्यासाठी स्थानिक जनसमुहांच्या सल्ला-मसलतीने एकात्मिक व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येईल.

४. **गोवा** – गोवा राज्याचे, सागरकिनारा सपाट प्रदेश, मध्य व उंचवट्यावरील प्रदेश आणि पश्चिम घाट असे तीन भौगोलिक विभाग पडतात. पश्चिम घाटाला लागून असलेल्या मध्य व उंचवट्यावरील प्रदेशामध्ये खाणकाम सुरु आहे तर संपूर्ण पश्चिम घाट प्रदेश हा अत्यंत महत्त्वपूर्ण जैवविविधतासंपन्न क्षेत्रांपैकी एक असून वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ अंतर्गत संरक्षित आहे. म्हणून, शाश्वत विकास आणि गोव्यामधिल सागरकिनारा क्षेत्रातील परिसंस्थेचे संरक्षण देण्यासाठी काटेकोर नियमन यंत्रणा उभारण्याची तरतूद प्रस्तावित केली आहे. सागरकिनाऱ्यांवर राहाणाऱ्या लोकांची पारंपरिक उपजीविका ही मासेमारी आणि तत्सम उद्योग आहे. या मच्छिमार लोकांच्या उपजीविकेच्या दृष्टीने मुलभूत पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे.

७. **काही जैवभौगोलिक राखीव क्षेत्रांसाठी विशेष तरतूदः** सुंदरबन, चिलका, मन्नारचे आखात, पिचावरम, भितरकनिका इ. जैवभौगोलिक राखीव क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रमाणात लोकसंख्या वसली आहे. या क्षेत्रामध्ये, सागरकिनारा नियमन क्षेत्र - एक (पोटकलम एक)नुसार विकासकामांवर निर्बंध आहेत. सुंदरबनमध्ये काही मुलभूत पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी विशेष तरतूद देण्यात आली आहे. हीच तरतूद बाकीच्या जैवभौगोलिक राखीव क्षेत्रांनाही लागू असेल.

८. **मुंबईतील खारफुटीच्या जंगलांचे संरक्षण करण्यासाठी वरुन जाणारे रस्ते बांधणी** – विशेषतः मुंबई, नवी मुंबई, गोवा इ. भागातील सागर किनारा नियमन क्षेत्र - दोनमध्ये मोडणाऱ्या काही नागरी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खारफुटी वनस्पतींचे जंगल

आढळते. नागरी पायाभूत सुविधांच्या विस्तारात, विशेषत: सीमांवरुन जाणारे रस्ते किंवा जोडरस्ते यांसाठी पद्धतशीरपणे खारफुटी वनस्पतीचे जंगल नष्ट करण्यात येत आहे. खारफुटीच्या वाढीवर आणि भरती-ओहोटीच्या प्रवाहावर दुष्परिणाम करणार नाहीत अशा पद्धतीने वरुन जाणाऱ्या रस्त्यांची बांधणी करु देण्याची तरतूद प्रस्तावित केली आहे. तथापि, सागरकिनारा नियमन क्षेत्र - दोनमधील फायदे अशा रस्त्यांच्या जमिनीकडील दिशेने असलेल्या क्षेत्राला लागू असणार नाही.

९. **परवानगी देण्याची मुदत:** सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेमध्ये परवानगी आहे अशा स्वरुपाच्या कामांना परवानगी देण्याबाबत कोणतीही कार्यपद्धत आखलेली नाही. याचा लोकांना किंवा प्रकल्प राबविणाऱ्या विभागांना खूप त्रास होतो. तसेच, परवानगी मिळण्याबाबत कोणतीही मुदत किंवा कालावधी निश्चित केलेला नाही. या प्रश्नांना सोडविण्यासाठी एक ठराविक कार्यपद्धत आखण्यात आली आहे ज्याद्वारे सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी, अभ्यास / अहवाल, नकाशे आणि परवानगी मिळवण्याठी भरावयाचे आवश्यक फॉर्म नमूद केलेले असतील. एखाद्या प्रकल्पाबद्दल आवश्यक ती सर्व माहिती राज्य सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (State Coastal Zone management Authority) यांच्याकडे सादर केल्यानंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत पोच देणे आणि त्यापुढील साठ दिवसांच्या आत पर्यावरण आणि वन मंत्रालय किंवा राज्य सरकारने परवानगीचा निर्णय कळवणे अभीप्रेत असेल.

१०. **परवानगीची प्रक्रीया ही पर्यावरणीय आघात मूल्यमापन २००६ च्या निकषांशी जुळवून घेणारी असावी:** १९९१च्या अधिसूचनेमध्ये, ५ कोटी रुपयांपेक्षा कमी खर्चाच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी राज्य सरकारने परवानगी द्यावी आणि ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्यास पर्यावरण आणि वन मंत्रालयाने परवानगी द्यावी अशी सोय आहे. याला शास्त्रीय आधार नाही. नवीन नियम, पर्यावरणीय आघात मूल्यमापन २००६ मध्ये नमूद कार्य पद्धतीनुसार कार्यान्वित होईल. २०,००० चौरस मीटरपेक्षा मोठे गृहनिर्माण प्रकल्प सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडून शिफारस प्राप्त केल्यानंतर पर्यावरणीय आघात मूल्यमापन, २००६ अंतर्गत मूल्यमापनासाठी पर्यावरणीय आघात मूल्यमापन समितीकडे सादर करुन घेतला जाईल, तर २०,००० चौरस मीटरपेक्षा कमी आकाराचे गृहनिर्माण प्रकल्प राज्य सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे परवानगीसाठी सादर करुन घेतले जातील आणि राज्य सरकारच्या नगर विभाग किंवा पंचायत विभागाकडून परवानगीचा निर्णय कळविण्यात येईल.

११. **परवानगी मिळाल्यानंतरची देखरेख:** परवानगी दिल्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीवरील देखरेख, कामकाजावरील देखरेख आणि अटींचे पालन करण्यातील पूर्तता याबाबत स्पष्ट आणि योग्य कार्यपद्धत आखण्यात यावी.

१२. **अंमलबजावणीसाठी नव्या तरतूदी:** १९९१च्या अधिसूचनेमध्ये अंमलबजावणीबाबत फारसा उल्लेख नाही. प्रस्तावित दुरुस्तीमध्ये सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्रधिकरणाला नियमाचे उल्लंघन केलेल्या कामाची योग्य ठरलेल्या वेळेत दखल घेणे आणि त्याबाबत कृती करण्याची तरतूद असेल. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत राज्य सागरकिनारा व्यस्थापन प्राधिकरण व राष्ट्रीय सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणास बहाल केलेल्या अधिकारांचा नव्या तरतूदीत उल्लेख असेल.

१३. **सागरकिनारा व्यवस्थापन आराखडा तयार करणे:** १९९१च्या अधिसूचनेमध्ये असे आाराखडे तयार करण्याबाबत कोणत्याही सूचना, मापनाची प्रक्रीया, नकाशांचे प्रमाण, पद्धत, मूल्यमापनाची कार्यपद्धत, प्रत्यक्षातील वस्तुस्थिती इ. नोंदविण्याची सोय नाही. यामुळे स्थानिक जनसमुहांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणून, (सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २७/९/१९९६ रोजी दिलेल्या आदेशाच्या पूर्ततेनुसार) राज्याने सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक कार्यपद्धतींबाबत सूचनांचा समावेश अधिसूचनेमध्ये केला जाईल. ज्या राज्यांनी अजून सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार केला नसेल किंवा तयार करण्यात कमी पडत असेल तर पर्यावरण आणि वन मंत्रालय, नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल झोन मॅनेजमेंटसारख्या मान्यवर विज्ञान संस्थांच्या मदतीने तांत्रिक आणि वित्तीय मदत करुन आराखडा तयार करुन देण्यात येतील.

१४. **दुहेरी कार्यपद्धत संपवणे:** सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना, १९९१ आणि पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना, २००६ यांचा एकत्रित संबंध येणाऱ्या काही प्रकल्पांबाबत, उदा. बंदर, गोदी, गृहनिर्माण प्रकल्प, इ. बाबत परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीत दुहेरीपणा आहे. यामध्ये तारतम्य तयार करण्यासाठी ज्या प्रकल्पांना पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचनेनुसार परवानगीची गरज आहे त्यांना त्यापूर्वी राज्य सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडून योग्य त्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतरच पुढे जाता येईल. ज्या इतर प्रकल्पांना पर्यावरणीय आघात मूल्यमापन करुन घेण्याची गरज नाही परंतु सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत परवानगीची गरज आहे अशा प्रकल्पांचा केवळ सागरकिनारा नियमन क्षेत्र अधिसूचनेअतर्गत विचार केला जाईल.

१५. **मच्छिमारांसाठी सोयीसुविधा:** मच्छिमारांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या समस्यांचा विचार करुन, काही मुलभूत सुविधा उदा. मासे सुकवण्याची जागा, लिलावाची सभागृहे,

जाळी विणण्याच्या जागा, पारंपरिक होड्या बांधण्याच्या जागा, बर्फाचा चुरा करायचे गाळे, मत्स्यप्रक्रीया सुविधा इ. सागरकिनारा नियमन क्षेत्र - तीनमधील ना विकास क्षेत्रामध्ये पुरविण्यात येतील.

१६. **संकेतस्थळाची निर्मिती आणि देखरेख:** सागरकिनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कामकाजातील पारदर्शकता शाबूत ठेवण्यासाठी एका संकेतस्थळाची निर्मिती करुन त्यावर कामकाजाचे विषय, तपशील, घेण्यात आलेले निर्णय, परवानगी पत्र, नियमाचे उल्लंघन, त्यावरील कारवाई, न्यायालयीन प्रकरणे इ. बाबत माहिती पुरविणे ही प्राधिकरणाची जबाबदारी असेल.

१७. **भाषेतील सुधारणा:** १९९१ची अधिसूचना सर्वसामान्य लोकांना समजेल आणि वाचकांना सहज उपब्ध होईल यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.